# दूध भेसळसम्राटांवर कारवाई करा!

संपादकीय

डॉ. महावीर अक्कोळे
mahaveerakkole@gmail.com



गेल्या काही दिवसांपासून सांगली जिल्ह्यात दूध भेसळ करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे धाडस प्रशासनाने दाखविले आहे. मात्र ही कारवाई फक्त सांगली जिल्ह्यापुरतीच मर्यादीत न राहता या कारवाईची व्याप्ती राज्यभर वाढविणे गरजेचे आहे. कारण दूध म्हणजे अमृत आहे. या दुधात भेसळ करून लाखो रूपयांची माया कमविणाऱ्या भेसळसम्राटांवर कारवाई झालीच पाहिजे. दुधात युरिया, तसेच घातक रसायने तयार करून दुधाच्या भुकटीमध्ये मिसळून बनावट दूध तयार करणारी साखळी सध्या सर्वत्र कार्यरत आहे. सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ, बोरगांव, शिरढोण, तसेच सांगली शहरात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने कारवाई करून दोघांना गजाआड केले. हजारो रूपयांची भेसळयुक्त दुधाची भुकटी जप्त करण्यात आली. तसेच युरियासारखी खते देखील दुधामध्ये मिसळली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलेला आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दूध आंदोलन करून राज्यातील तमाम दूध उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला. आज १० फॅटच्या दुधाला जवळपास ३० रूपये भाव मिळतो. त्यातच राज्यात दुधाची मोठी टंचाई आहे. नेमका याचाच फायदा काही दुधा-तील भेसळसम्राटांनी उचलला आहे. दुधामध्ये केमिकल मिक्स करून लाखो रूपये कमवायचे हा नवा फंडा या भेसळसम्राटांनी अंमलात आणलेला आहे. त्यांच्यावर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. एखाद्या दूध संकलन केंद्राकडे दूध संकलन होते किती नि दूध जमा करताना करतो किती याचा हिशेब लागल्यास दुधातील मोठी तफावत जाणवेल. अनेक दूध संकलन केंद्रे भ्रष्टाचाराने भरबडून जाऊन लयास केल्या आहेत. राज्यात जवळपास १४ हजार दूध संस्था तोट्यात आहेत.मुळात असा प्रश्न निर्माण होतो की, या दूध संस्थात तोट्यात येतातच कसे? शेतकऱ्यांकडून ६ फॅटचे दूध २१.५० रूपये दराने खरेदी केले जाते. आणि तेच दूध ३० रूपये दराने विक्री केले जाते. मग तोटा येतोच का ? भ्रष्ट कारभाराने बुडालेल्या संस्था फार काळ तग धरल्या नाहीत.

दुधात फार मोठी काळी कमाई आहे. शासनाने याकडे फारसे गांभीर्याने पाहिलेले नाही. दुधाची टंचाई भरून काढण्यासाठी भेसळयुक्त दूधाची संकल्पना या भेसळसम्राटांनी पुढे आणलेली आहे. या भेसळयुक्त दुधामुळे जनतेचे आरोग्य धोक्यात आले आहे. सर्वात जास्त मुंबईमध्ये दुधाची भेसळ केली जाते. मोठ्या कंपन्यांच्या दुधात मोठ्या प्रमाणात भेसळ केले जाते. सिरिंजद्वारे दूध काढून त्यामध्ये पाणीही मिसळले जाते. शेतकरी शेतात राब राब मरतो नि हाताच्या फोडाप्रमाणे जपून जनावरे सांभाळून त्याचे दूध डेअरीला घालतो. येथूनच दुधाच्या भेसळीला सुरवात केली जाते. एसएनएफ च्या नावाखाली स्थानिक गवळी म्हशीच्या दुधात गायीचे दूध मिक्स करतो. तसेच फॅट वाढीसाठी मोरचूद व साखर इत्यादी पदार्थांचा वापर केला जातो. हेच मिक्स दूध जवळच्या संकलन केंद्रामध्ये जाते. येथेही भेसळ करणारे अनेक महाभाग आहेत. गरीब जनतेला भेसळयुक्त दूध पाजून हे भेसळसम्राट फार मोठा अन्याय करीत आहेत. तरीही कारवाई एका जिल्ह्यापुरतीच मर्यादीत राहिलेली आहे. सध्या दुधाचा पुष्टकाळ सुरू झाला आहे. दूध संकलन हळूहळू वाढत आहे. त्याप्रमाणे दुधात भेसळही वाढत आहे. दुधाची भुकटी करताना शासनाने निकष ठरवून दिलेले आहेत. मात्र हे निकष धाब्यावर बसवून अनेकजण भेसळयुक्त दुधाची भुकटीच तयार करीत आहेत. या भुकटींमुळे लहान मुलांना पोटाचे विकार जडण्याचे प्रकार घडत आहेत. तसेच आतड्याचे आजार बळावत आहेत. महाराष्ट्र सरकारने राज्यात धवलक्रांती आणली असल्याचा टेंभा मिरविते. मात्र परराज्यातून मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त दूध येताना शासन मात्र ढिम्म पणे आ वासून बघत राहत आहे. एकीकडे दूध उत्पादक शेतकरी दिवसेंदिवस मरत आहे. तर दुसरीकडे दूध सम्राट कोट्यवधी रूपये कमवून मूग गिळून गप्प आहेत. महाराष्ट्र शासनाने किती भेसळसम्राटांवर कारवाई केली याची चौकशी झाली पाहिजे. दुधामध्ये भेसळ करणाऱ्यावर जन्मठेपेची शिक्षा केली पाहिजे. कारण दुधात घातक रसायन उद्ध्वस्त करून सर्वसामान्यांच्या जीवांशी खेळ करण्याचा उद्योग सुरू केला आहे. दुधाळ जनावरे वाढविण्यासाठी शासनाने म्हणाव्या तशा उपाययोजना देखील केलेल्या नाहीत. धवलक्रांती फक्त नावालाच उरलेली आहे. राज्यात दुधाची टंचाई असताना राज्य शासनाने दुधाच्या दरात वाढ करायला पाहिजे होते. मात्र भेसळसम्राटांना अभय देण्यासाठी दुधाच्या दरात वाढ करणे शासन ना - ना करत आहे. शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर दुधाला दर दिले गेले पाहिजे. प्रति फॅट ४ रूपये प्रमाणे दर दिल्यास शेतकऱ्यांच्या पदरात ४ पैसे पडणार आहेत. शेतकऱ्यांच्या चांगल्या दुधाला भाव द्यायचे नाही नि भेसळयुक्त दुधावर कारवाई करण्यासाठी धरसोड वृत्ती दाखवायचे हा नौटंकीपणा बंद केले पाहिजे. अन्यथा स्वाभिमानी शेतकरी संघटना पुन्हा दूध आंदोलन केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.

शेतकरी संघटना स्वाभिमानी

◆ वर्ष ५ ◆ अंक १८ ◆ १५ ऑगस्ट २०१० ◆ **संपादक :** खासदार राजू शेट्टी Email : rajushetti@gmail.com
◆ **कार्यकारी संपादक :** डॉ. महावीर अक्कोळे ◆ **सह संपादक :** डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार,
◆ **मानद सल्लागार :** मा. श्री. अण्णा हजारे राळेगणसिद्धी, न्या. पी. बी. सावंत पुणे, न्या. बी. जी. कोळसे पाटील पुणे,
. प्रा. शरद पाटील सांगली, कुमार सप्तर्षी पुणे, माजी आमदार. वामनराव चटप चंद्रपूर ◆ **व्यवस्थापक :** सुभाष शेट्टी
◆ **कार्यालय :** भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

**SWABHIMANI VICHAR (Fortnightly)** स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक *खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशननजीक, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. **Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213** या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

वार्षिक वर्गणी
रु. १००/-

# वैभववाडी–कोल्हापूर रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण पूर्ण

## खासदार राजू शेट्टी यांच्या प्रयत्नाला यश



कोल्हापूर (स्वाभिमानी वृत्तसेवा): सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी ते कोल्हापूर असा रेल्वेमार्ग टाकण्यात येणार आहे. या मार्गाचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. त्यामुळे या मार्गाच्या प्रस्तावाला ग्रीन सिग्नल मिळाल्यास कोकणात रेल्वेचे जाळे पसरण्यास मदत होणार आहे. याबाबत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे.

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड व कोकण रेल्वे स्थानक ते कोल्हापूर स्थानकापासून नवीन रेल्वेमार्ग उभारण्यांसदर्भात प्राथमिक सर्व्हे करण्याचे काम पूर्ण झाले असून, सविस्तर सर्व्हे अहवाल महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डास सादर करण्यात आलेला आहे. त्यामुळे हा मार्गाला लवकरच केंद्राची मंजुरी मिळेल अशी शक्यता निर्माण झालेली आहे.

vishal Yadav 9850291294
9921151199

इंडो प्रिंटर सर्व्हिसेस

Dot Matrix Specialist

■ EPSON, TVS, WEP., HP ■ Sales & Services ■ Dot Matrix, Laser, Inkjet Printer Repairs ■ Printers Carteridges & Toner Refilling

चालू स्थितीतील जुने प्रिंटर मिळतील.

९ वी गल्ली, सुभाष रोड, देमापुरे ऑईल मिलजवळ, जयसिंगपूर



श्री भरत अर्बन को-ऑफ बँक लि., जयसिंगपूर

ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२९९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३

■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वत:चे इमारतीत ■ अद्यावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ लाखापर्यंतच्या ठेवीस विमा संरक्षण देशातील प्रमुख ४८८ शहरांवरील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज ■ १० ग्रॅम चोख सोन्यास रु. १३००० कर्ज १० टक्के व्याजदराने

| ठेवी | कर्जे | ऑडिट वर्ग | | स्वभांडवल | गुंतवणूक | एन.पी.ए. |
|---|---|---|---|---|---|---|
| ४१४७.९५ | २१७८.७१ | ---- | नफ्यात | ४५५.१५ | २१८९.४३ | ३.३७ टक्के |

श्री. व्ही. बी. हुग्गे.
बी. ए. बी. कॉम.
चिफ एक्झि ऑफिसर

श्री. अशोक शां रूणवाळ.
बी. कॉम
व्हा. चेअरमन
व सर्व संचालक

पै. विठ्ठल बाबूराव मोरे
एम. ए.
चेअरमन

आदिशक्ती कन्स्ट्रक्शन
जयसिंगपूर
प्रोप्रा. मिलींद साखरपे




अधिकृत विक्रेते
बाहुबली इलेक्ट्रिकल्स
आझाद रोड, ८वी गल्ली, जयसिंगपूर.
फोन:(०२३२२)२२५९०५, २२७४०५ मोबा.:९४२११७३१४७

गोमटेश इलेक्ट्रिकल्स
जामे मस्जिद समोर, मेट्रो ऑटोजवळ, पटेल चौक, सांगली.
फोन नं.(०२३३) २६२१०९६ मोबा.:९९६०४०६३१३

TEXMO
AQUATEX
अधिकृत विक्रेते
श्री वितराग एंटरप्रायझेस
सोन्या मारुती मंदिरासमोर, कोल्हापूर रोड, इचलकरंजी
फोन : (ऑ.) ०२३०/ २४३१०८
मोबा. : ● विपुल - ९३२६९५३०२७ ● बाबासाहेब : ९३२५७६१२२९



प्रोप्रा. अरुण किर्तीकुमार माणगावे
M/S. MANGAVE BOREWELLS
BOREWELL CONTRACTOR
Opp. Mangave Petrol Pump. Jaysingpur. Dist : Kolhapur (M.S.)
Ph. (02322) 229866. Mo. 9822551008/9422428266



Shree Datta
Prestrestess
M.f. PCC Pole
Shirol Road, Jaysingpur.

# दूध उत्पादकांच्या प्रश्नांना वाचा फोडणार : खासदार राजू शेट्टी

**कौलव (स्वाभिमानी वृत्तसेवा)**: पश्चिम महाराष्ट्रात दुधा-तून शेतकऱ्यांची केली जाणारी लूट रोखण्यासाठी स्वाभिमानी दूध संघाची स्थापना केली असून, स्वाभिमानी दूध लवकरच पुण्या – मुंबईची बाजारपेठ काबीज करेल, असा विश्वास दूध संघाचे संस्थापक व खासदार राजू शेट्टी यांनी व्यक्त केला. संसदेच्या आगामी अधिनेशनात दूध उत्पादकांच्या प्रश्नांना वाचा फोडणार असल्याचे खा. शेट्टी यांनी सांगितले.

स्वाभिमानी दूध संघाच्या परिते (ता. करवीर) येथील दूध शीतकरण केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी खासदार राजू शेट्टी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वाभिमानी पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. जालंदर पाटील होते. साखर सम्राटांबरोबरच दूध सम्राटांनीही गोरगरीब दूध उत्पादकांच्या हितावर नांगर फिरवला असून दूध उत्पादकांची अक्षरक्ष : लूटमार होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. यावेळी प्रा. जालंदर पाटील, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कोल्हापूर जिल्हाध्यक्ष भगवानराव काटे, उल्हास पाटील, डॉ. सुभाष अडदंडे, भोगावती साखर कारखान्याचे अध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी हरिभाऊ चौगुले, विलास पाटील, वासुदेव पाटील, प्रकाश पाटील, अजित पोवार, साताप्पा पाटील, आर्दीसह भोगावती परिसरातील कार्यकर्ते उपस्थित होते. जनार्दन पाटील यांनी प्रास्ताविक केले.



**कौलव : स्वाभिमानी दूध संघाच्या परिते (ता. करवीर) येथील दूध शीतकरण केंद्राचे उद्घाटन करताना खासदार राजू शेट्टी व इतर मान्यवर.**

# जयसिंगपुरात स्वाइन फ्लू लसीकरण

**जयसिंगपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा)**: येथे स्वाभिमानी बहुउद्देशीय सेवा संस्था आणि रोटरी क्लब ऑफ ग्रीन सिटी यांच्या वतीने स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यालयात स्वाइन फ्लू लसीकरण मोहीम राबविण्यात आली. या दोन्ही सेवाभावी संस्थांना शहर इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. महावीर अक्कोळे यांनी स्वाइन फ्ल्यूची लस उपलब्ध करुन दिली. स्वाभिमानी बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष शैलेश चौगुले, सुभाष शेट्टी यांचे सहकार्य लाभले. अल्पदरात इंडियन मेडिकल असोसिएशन शाखेने लस उपलब्ध करून दिली आहे. रोटरी ग्रीन सीटीचे अध्यक्ष नंदू बलदवा, डॉ. अक्कोळे, डॉ. श्रीवर्धन पाटील, डॉ. अजित पाटील, डॉ. किरण पाटील यांच्या उपस्थितीत डॉ. श्रध्दा शेट्टी यांनी नागरिकांना लस दिली. जयसिंगपूर शहर व परिसरातील नागरिकांनी लस उपलब्ध होण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघयना कार्यालयात नाव नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले. सुभाष शेट्टी, भरत बँकेचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, संजीव पाटील, महावीर पाटील, प्रा. अभय भिलवडे, प्रा. सासणे आदी उपस्थित होते. स्वागत सागर मादनाइक यांनी केले. राजू नरदे यांनी आभार मानले.



**जयसिंगपूर येथे शहर इंडियन मेडिकल असोसिएनतर्फे स्वाइन फ्लू लसीकरणप्रसंगी डॉ. महावीर अक्कोळे, डॉ. अजित बिरनाळे, शैलेश चौगुले, डॉ. श्रद्धा शेट्टी, नंदू बलदवा.**

# खत परवाना निलंबनाची कारवाई ठरतेय फार्स

**कोल्हापूर (प्रतिनिधी)**: रासायनिक खतांचा काळाबाजार करून पैसे कमवा, पुढारी किंवा अधिकाऱ्यांना हाताशी धरून दोन-चार महिन्यात रद्द झालेला परवाना पुन्हा मिळवा....असाच प्रकार पश्चिम महाराष्ट्रात सध्या सर्रास आहे. खतांची लिंकिंग जोरात सुरू असून शेतकऱ्यांची खुलेआम लूट सुरू असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. गेल्या पाच वर्षापासून खतांची लिंकिंग सुरू असताना कृषी खात्याने मात्र गांधारीची भूमिका घेतलेली आहे. कृषी अधिकाऱ्यांकडून थातूर माथूर चौकशी केली जाते. कारवाईचा इशारा दिला जातो, मात्र कारवाईच केली जात नाही. अनेक भरारी पथके स्थापन केली तरीही ती पथके निष्प्रभ ठरलेल्या आहेत. खतांचा काळाबाजाक करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा दिला जातो. त्यांच्यावर फौजदारी कारवाई करू असा इशारा दिला जातो. असा इशारा कृषिमंत्री, पालकमंत्री व जिल्हाधिकारी असे सारेच देतात. त्यामध्ये फारसे तथ्य नसते. आतापर्यंत काळाबाजार हे शेतकऱ्यांनीच रोखलेली आहे. कारवाई करताना कृषि अधिकारी खचखाऊ भूमिका घेतात. त्यामुळे शेतकरी अनेकदा आक्रमक झालेले आहेत.

## दूध भेसळीच्या राज्यातील रॅकेटवर कारवाई व्हावी : खासदार राजू शेट्टी

**सांगली (स्वाभिमानी वृत्तसेवा)**: सांगलीत पकडलेले दूध भेसळीचे रॅकेट हे हिमनगाचे टोक आहे. राज्यात विषेशतः मुंबई, अहमदनगर, बारामती, कोल्हापूर, पुणे या ठिकाणी दूध भेसळीचे खूप मोठे अड्डे आहेत. त्यांच्यावर शासनाने कडक कारवाई करण्याची गरज आहे, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी केली.

भेसळीमुळे जनतेच्या जीवाशी अक्षरशः खेळ सुरू आहे. याला राज्यकर्त्यांचाच अप्रत्यक्ष पाठिंबा आहे. यात सत्तेतील अनेकजणांचा सहभाग आहे. याला अन्न औषध प्रशासन व पोलिसही कारणीभूत आहेत. सांगलीत झा-लेली कारवाई योग्यच आहे. अशीच कारवाई राज्यातील सर्व जिल्ह्यांत होण्याची आवश्यकता आहे, तरच भेसळसम्राटांचे अड्डे उद्ध्वस्त होतील. तसेच दूध भेसळीबाबत शासनाने कडक कायदा करण्याची आवश्यकता आहे. भेसळीचा गुन्हा अजामीनपात्र ठरवून गुन्हेगारांना जन्मठेपेची शिक्षा देण्याची तरतूद कायद्यात करावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केलेली आहे. भेसळीविरोधात व कायद्यासाठी भविष्यात संघटना, आंदोलन करणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

# सांगली जिल्ह्यात १५ हजार हेक्टर सोयाबीला कीड

## पाने खाणाऱ्या उंटअळी, बिहारी अळीचाही पिकांना जोरदार फटका

**सांगली (स्वाभिमानी वृत्तसेवा)** : सांगली जिल्ह्यात सुमारे १५ हजार हेक्टर सोयाबीन क्षेत्रावर पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव झाला आहे. सततचा पाऊस, दमट हवामान आणि कडक उन्हाचा अभाव यांमुळे ही कीड वेगाने पसरली आहे. पावसाच्या उघडिपीचा फायदा घेऊन शेतकऱ्यांनी तातडीने उपाययोजना करावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

शासनाने सोयाबीन आणि कापूस पिकांच्या कीडरोग व्यवस्थापनासाठी सर्वेक्षण आणि संनियंत्रणाचे नवीन काम सुरू केले आहे. सांगली जिल्ह्यात पाच कीड सर्वेक्षक, एक नियंत्रक आणि एक संगणक प्रचालक असे पथक काम करत आहे. चाळीस गावांत साठ हजार हेक्टर क्षेत्रामध्ये किडीचे सर्वेक्षण केले जात आहे. प्रत्येक सर्वेक्षकाकडे बारा हजार हेक्टर क्षेत्र सोपवण्यात आले आहे. आठवड्यातून चार दिवस सर्वेक्षण करून त्याचा अहवाल विद्यापीठांना देण्यात येतो. तेथून संबंधित शेतकऱ्यांना मोबाईलवर कीड नियंत्रणासाठी एसएमएसद्वारे मार्गदर्शन केले जाते.




सोयाबीनची पाने खाणाऱ्या अळीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

सध्या सुरू असलेल्या सर्वेक्षणानुसार सुमारे पंधरा हजार हेक्टर क्षेत्रात पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव झाल्याचे स्पष्ट झाले आहे. कीडनियंत्रक पी. एस. नागरगोजे म्हणाले, ''नदीकाठच्या सोयाबीनला याचा जास्त फटका बसला आहे. ही अळी सध्या कोषनिर्मितीच्या शेवटच्या टप्प्यात आहे. त्यामुळे आताच तिचे नियंत्रण केल्यास मोठा प्रादुर्भाव रोखणे शक्य आहे. उंटअळी नियंत्रणात असली, तरी पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव मात्र वेगाने वाढत आहे. त्या शिवाय केसाळ बिहारी अळी, फुलकिडे यांचाही प्रादुर्भाव सोयाबीनवर झाला आहे. अंकुर ९३०५ जातीचे सोयाबीन तुलनेने किडीला कमी बळी पडले आहे; तर जीएस ३३५ ला जास्त फटका बसला आहे.''

सोयाबीनवरील कीडनियंत्रणासाठी फेरोमन सापळ्याचा वापर करावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. दहा लिटर पाण्यात वीस ग्रॅम बिव्हेरिया बॅसियाना मिसळून फवारणी करावी तसेच एन्डोसल्फान ३५ ईसी २० मिली किंवा क्लोरोपायरीफॉस २० ईसी २० मिलीची फवारणी करावी,



# ऊसतोडणी मजुरीत १९ टक्क्यांनी वाढ

पुणे : यंदाचा गळीत हंगाम हा राज्याच्या इतिहासातील सर्वांत विक्रमी ठरणार आहे. प्रचंड प्रमाणात असलेल्या उसाची वेळेत तोडणी होण्याच्या उद्देशाने राज्यातील तोडणी मजुरांच्या मजुरीत १९ टक्क्यांनी वाढ करण्यात येत आहे.

यंदाच्या हंगामात राज्यात प्रचंड ऊस उपलब्ध आहे. सुमारे ७५० लाख टन इतक्या उसाचे गाळप करण्याचे आव्हान राज्यातील साखर कारखान्यांसमोर उभे आहे. त्यामुळे बंद कारखाने सुरू करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याबरोबरच उसाची तोडणी, वाहतूक आणि सर्वच पातळ्यांवर यंत्रणा योग्यपणे चालावी, असा सरकारचा प्रयत्न आहे. त्यामध्ये तोडणी मजुरांची चणचण हा मोठा प्रश्न आहे. गेल्या वर्षीही विविध भागांत तोडणीसाठी अडचणी निर्माण झाल्या होत्या. राज्यात सुमारे नऊ लाख तोडणी मजूर आहेत. त्यापैकी साडेपाच ते सहा लाख मजूर प्रत्यक्ष कामासाठी उपलब्ध होतात. त्यांच्यापैकी सुमारे पंधरा टक्के मजूर गेल्या हंगामात तोडणीच्या कामासाठी परराज्यांत गेले होते, असा अंदाज आहे. परराज्यांत अधिक मजुरी मिळत असल्यामुळे ते तिकडे गेल्याचे आढळून आले आहे.

त्या पार्श्वभूमीवर यंदा मजुरीचा प्रश्न हाताळण्यात येणार आहे. राज्यात सध्या प्रतिटन १३५ रुपये इतका मजुरीचा दर आहे. यंदापासून त्यामध्ये १९ टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे; तसेच १७ टक्के कमिशनही मिळणार आहे. गेल्या हंगामात परराज्यांत गेलेल्या मजुरांनाही कबूल केल्याप्रमाणे मजुरी मिळाली नसल्याचे अनुभव आहेत. त्या पार्श्वभूमीवर यंदा मजूर राज्यातच थांबतील, अशी आशा आहे.

तोडणी मजुरांची चणचण लक्षात घेता राज्याच्या विविध भागांमध्ये तोडणी यंत्राचा (हार्वेस्टर) वापर वाढू लागला आहे. राज्यात सध्या लहान-मोठी ८४ तोडणी यंत्रे आहेत. त्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. मात्र, तोडणी यंत्राच्या वापरासाठी उसाची लागवड विशिष्ट पद्धतीने करण्याची गरज भासते. त्यामुळे हंगाम सुरू होण्यापूर्वीच त्याचे नियोजन आवश्यक ठरते. दरम्यान, तोडणी यंत्रासाठी साखर विकास निधीतून (शुगर डेव्हलपमेंट फंड) कर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी केंद्र सरकारकडे करण्यात येणार आहे.

# २७ राष्ट्रीयकृत बँकांची थकित कर्जे ५४ हजार कोटी

**नवी दिल्ली** : वृत्तसंस्थाः बँकाची थकित कर्जाबाबत एक धक्कादायक वृत्त निदर्शनास आलेले आहे. ३१.१२.२००८ ती थकित कर्जे आणि ३१.१२.२००९ ची थकित कर्जे यांची माहिती देण्यात आली होती. या माहितीचा परामर्श घेतला असताना खालील धक्कादायक गोष्टी लक्षात आल्या. दि. ३१.१२.२००८ ती सर्व बँकांची थकित कर्जाची रक्कम रू. ४०.९२४/- कोटी होती, तर या रक्मेत एका वर्षामध्ये झालेली वाझ १३,२०४/- कोटी होती. म्हणजेच ३१.१२.२००९ रोजी सदर रक्कम ५४,१७८/- कोटी होती. या वाढीची सरासरी काढली असताना ही वाढ ३२.३९ टक्के होती. परंतु या २७ राष्ट्रीयकृत बँकापैकी फक्त सहा बँकांमध्ये झालेली वाढ १० टक्क्यांपेक्षा कमी होती. तर आठ राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये ही वाढ ५० टक्क्यांपेक्षा जास्त आढळून आली. तर उरलेल्या १३ बँकांमध्ये हे प्रमाण १० ते ५० टक्क्यांच्यामध्ये होते. इंडियन ओव्हरसीज बँकेत हे प्रनाण तर १०४.८५ टक्के दिसून आले.

वरील सर्व माहिती लक्षात घेता आणि राष्ट्रीयकृत बँकांच्या थकबाकीमध्ये होणारी एका वर्षातील ही वाढ या बँकांच्या एकूणच कारभाराबद्दस संशय निर्माण करणारी आहे. आणि म्हणूनच अर्थमंत्रालय आणि सर्व बँकिंग क्षेत्रावर नियंत्रण ठेवणारी आणि आम्ही ठेवीदारांचे हित जपणारे आहोत असा टेंभा मिरवणाऱ्या रिझर्व्ह बँकेने कमीत कमी खालील गोष्टींचा खुलासा करणे गरजेचे आहे.



कर्जाच्या रकमा थकीत आहेत की बुडीत कर्जाच्या आ-हेत? तसेच आता २००९ - २०१० या आर्थिक वर्षाच्या म्हणजेच ३१.०३.२०१० च्या थकित रकमा तसेच त्यामध्ये एका वर्षात किती वाढ झाली त्याची सविस्तर माहिती जन-तेसमोर ठेवणे गरजेचे आहे. तसेच निरनिराळ्या प्रकारची कर्जे दिली जातात. त्यातील कोणत्या प्रकारात दिलेली कर्जे ही जादा बुडीत आहेत? आणि यावर नियंत्रण ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने कोणती पावले उचलली आहेत?

या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये अर्थमंत्र्यांनी रू. १६५० हजार कोटींची तरतूद राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये वाटली गेल्याचे समजते. तरी जनहितार्थ या चार बँका कोणत्या याची माहिती जनतेसमोर उघड करणे आवश्यक आहे आणि ठेवीदारांना ज्यांनी या बँकामध्ये ठेवी ठेवल्या आहेत. त्यांना त्या सुरक्षित आहेत याची खात्री नियंत्रक बँक म्हणजेच रिझर्व्ह बँकेने जी नेहमी ठेवीदाराच्या सुरक्षिततेची काळजी घेत असल्याचा दावा करते त्यांनी आवश्यक आहे. राष्ट्रीयकृत बँकांच्या चाळीस टक्क्यांहून शाखा या तोट्यांमध्ये गेली अनेक वर्षे चालत आहेत तसेच यातील अनेक शाखांतील थकित कर्जाचे प्रनाण हे नव्वद टक्क्यांहून अधिक असून काही शाखांमध्ये ते १०० टक्के आहे. .I संदर्भात रिझर्व्ह बँक काय उपाययोजना करणार आहे? जेणेकरून या शाखांमधील ठेवीदारांचे आणि भागधारकांचे संरक्षण करण्यात येईल. तसेच ही थकीत आणि बुडीत कर्जे कशी वसूल करण्यात येईल. यासाठी रिझर्व्ह बँक काही परिणामकारक योजना आखणार आहे का?

राष्ट्रीयकृत बँकांनी दिलेल्या एकूण कर्जापैकी एक लाख चाळीस हजार कोटींहून अधिक कर्जे ही मोठ्या तीस - बत्तीस उद्योगपतींना दिली असून ती बुडित आहेत. यामध्ये खासगी बँकिंग क्षेत्र आणि इतर बँकिंग क्षेत्रे विचारात घेतली तर ही रक्कम सध्या दुप्पट असण्याची शक्यता आहे. त्यामुळे रिझर्व्ह बँकेचे कचखाऊ धोरणामुळे अनेकांते उखळ पांढरेच झालेले आहे. एकीकडे हजार - दोन हजार रुपयांसाठी घरावर जप्ती आणणारे बँकेचे अधिकारी एवढ्या मोठ्या कर्जदारांवर जप्ती का आणली जात नाही असा प्रश्न पुढे येत आहे.

# सरकारी कर्मचाऱ्यांच्या तुलनेत शेतकरी मागास

प्राध्यापकांचे आजचे वेतन ६० ते ८० हजारांवर गेले आहे. निखळ उत्पादक मूल्याचा विचार केला तर शिक्षक किंवा प्राध्यापकांच्या तुलनेत शेतकरी कैकपटीने सरस ठरतो. परंतु मिळकतीच्या संदर्भात हाच शेतकरी कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याच्या तुलनेत भिकारी ठरतो. हा अन्याय आहे, असे कुणालाच वाटत नाही. आपल्या पोळीवर तूप ओढून घेताना आपलाच अन्नदाता उपाशी मरत आहे, याचा वितार कुणी करत नाही आणि कृषीमालाच्या किमतीत थोडी वाढ झाली तर काय थयथयाट मांडल्या जात आहे. अन्नधान्याच्या किमतीत वाढ झाल्यामुळे सरकारवर टिकास्त्र सोडणाऱ्या लोकांनी याच सरकारने आपल्या कम 'चाऱ्यांमा गरज नसताना आणि देशात सुशिक्षित बेरोजगार तरूण असताना भरघोस पगारवाढ का दिली, हे कधीच खडसावून विचारले नाही.

धान्यापासून मद्यार्क निर्मितीची सगळीच चर्चा एकतर्फीच होती. धान्यापासून मद्यार्क निर्मितीला विरोध , हा एककलमी कार्यक्रम या चर्चेतून राबविला जात होता. जिथे शेतकऱ्यांच्या भल्याचा प्रश्न येतो आणि त्यासाठी इतरांना काही किंमत मोजावी लागण्याची शक्यता असते, तिथे या सगळ्यांचा विरोध एकवटून उफाळून येतो. इतर वेळी या दहा लोकांची तोंडे दहा दिशाला असतील, परंतु शेतकऱ्यांच्या आणि त्यातही कोरडवाहू गरीब शेतकऱ्यांच्या पदरात काही पडते म्हटले की, हे सगळे एका सुरात गळा काढू लागतात.

आता महागाईच्या संदर्भात ओरड सुरू झालेली आहे. आता सगळीकडे साखर, डाळी तसेच अन्य अन्नधान्याची महागाई या विषयावर चर्चा सुरू आहे. साध्या कांद्याचे भाव वाढले की अनेकजणांच्या डोळ्या पाणी येण्यास सुरवात होते. या मुद्दयावरून एखादे सरकार निवडणुकीत पराभूत होऊ शकते. महागाई आणि स्वस्ताई केवळ कृषी उत्पादनांशीच निगडीत आहे ता? औषधे, पेट्रोल, डिझेल, सिमेंट, लोखंड, सिनेमाची तिकीटे, पान - बिडी, हॉटेलमधील पदार्थ, सौंदर्य प्रसाधनाच्या वस्तू, कापड किंवा तयार कपडे, वीज , बि - बियाणे, किटकनाशके अशाच अनेक वस्तू दैंनदिन जीवनाशी निवडीत आहेत. यांचे भावही वाढलेले आहेत. त्यावर साध्या तक्रारीचा सूरही निघत नाही. हे मोठे आश्चर्यच म्हणावे लागेल. आज शेतकऱ्यांपेक्षा अनेक मजूरच श्रीमंत झालेले दिसत आहेत. शेतकऱ्यांच्या मालावर अनेक जण मोठे झालेले आहेत. दलाल, व्यापारी व उद्योजक शेतकऱ्यांच्या मालावरच मोठे झालेले आहेत. शेतकऱ्यांच्याच वस्तू शेतकऱ्यांनाच जादा दराने मिळतात. महागाईचा फटका शेतकऱ्यांनाही बसतो. मात्र त्यांच्या शेतीमालाला दर मिळत नाही. मिळाला तर दलाल लुबाडतो. मग न्याय कुणाकडे मागायचे? दर दहा वर्षांनी सरकारी कर्मचाऱ्यांना आयोगाप्रम णे वेतनवाढ होत असते. त्यांच्या वेतनात सध्या पाहता तिप्पट वाढ झालेली आहे. मग शेतकऱ्यांच्या शेतीमालाला तिप्पट भाव वाढ का दिली जात नाही?

१९६० मध्ये सरकारी नोकराला ११० रूपये वेतन होते. सोन्याचा भाव देखील ११० रूपये होता महागाई भत्ता मिळून १७५ रूपये हातात पडायचे. ३० वर्षानंतर त्याच नोकरदाराचा पगार २० हजार रूपये झाला. निवृत्तीवेतन होते ५ हजार रूपये. सध्या कुठलेही काम न करता १७ हजार रूपये दिले जातात. सोन्याचा भाव देखील त्याच्या आसपास आहे. मग याचा अर्थ असा होतो की सरकारी कर्मचाऱ्याला सोन्याच्या भाववाढीवर पगार ठरविले जाते. मग हा नियम शेतकऱ्यांच्या मालाला का लागू केला जात नाही. १९७२ पर्यंत सोन्याचा भाव, कर्मचाऱ्यांचे वेतन, कापसाच्या पिकाच्या भाव हे बरोबरीत होते. सोन्याच्या दराने आणि सरकारी कर्मताऱ्यांच्या पगाराने वेगाने झेप घेतली. मात्र शेतकऱ्यांच्या शेतीमालाने अजिबात झेप घेतली नाही. आज सरकारी कर्मचाऱ्यांच्याकडे गलेलठ्ठ पगार आहे. मग शेतकऱ्यांच्या पदरात काय आहे? विशेष म्हणजे कृषी उत्पादनाच्या भावात अतिशय मंदगतीने वाढ होत असली तरी शेतीसाठी लागणाऱ्या इतर आवश्यक उत्पादनांचा भाव मात्र सोन्याच्या स्पर्धेनेच वाढत गेला. एकेकाळी खताचे ५० किलोचे एक पोते १७ रूपयांना मिळायचे आणि त्याचवेळी ज्वारीचा भाव २०० रूपये होता आज ज्वारीचा भाव केवळ ८०० रूपये झालेले आहे. म्हणजेच चौपटीने वाढलेले आहेत. खताचा दर मात्र बारापटीने वाढलेले आहे. उत्पादनखर्च आणि प्रत्यक्ष उत्पन्नातील हाच फरक आज शेतकऱ्यांसाठी जीवघेणा ठरलेला आहे. नैसर्गिक न्यायानुसार ज्याप्रमाणे सरकार आपल्या कर्मचाऱ्यांना महागाईच्या प्रमाणत वेतन देते त्याप्रमाणात शेतकऱ्यांच्या शेतीमालालाही भाव मिळायला पाहिजे. शेतकरी आत्महत्या करतो तो कर्जबाजारी झाल्यानेच. मात्र महागाई वाढल्यावर जगण्याला कंटाळून एकाही बहाद्दराने आत्महत्या केल्याचे ऐकवित नाही. मग शेतकऱ्यांच्या शेतीमालाचे भाव का पाडले जातात? शेतीमालाचे भाव पडले की शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्या करतो हे त्रिवार सत्य असताना या गोष्टीकडे सरकार जाणीवपूर्वक कानाडोळा करीत आहे. कृषी उत्पादनाला मिळणारा भाव फारच कमी आहे . तरीही देखील महागाई वाढली असल्याची बोंब ठोकत आहेत. महागाईचा दरी वाढली असली तरी त्याचा फायदा शेतकऱ्यालाच अजिबात मिळालेला नाही. सगळेच लोक शेतकऱ्यांच्या जीवावर उठलेले आहेत. परंतु दुर्देवाने कष्टकरी शेतकरी विस्कळीत झालेली आहे. शेतकऱ्यांची एकी वाढल्याशिवाय सरकार दबाव गट निर्माण करता येणार नाही.




जयसिंगपूर : येथील भिर्डी सभागृहात भरत अर्बन को- ऑप. बँकेची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभेवेळी बोलताना खासदार राजू शेट्टी. व्यासपीठावर इतर मान्यवर.

# भरत बँक गोरगरीब व कष्टकरी जनतेच्या पाठीशी उभी : खा. शेट्टी

**जयसिंगपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा):** सहकार क्षेत्र अडचणीतून मार्गक्रमण करीत असताना भरत अर्बन बँक नेहमी गोरगरीब व कष्टकरी जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली आहे. बँक आपली आहे म्हणूनच प्रतिकूल परिस्थितीत सुध्दा आपण बँकेच्या पाठीशी राहून प्रगती साधली पाहिजे, असे प्रतिपादन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी केले.

येथील भिर्डी सभागृहात भरत अर्बन को-ऑप. बँकेची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत पार पडली. याप्रसंगी खासदार राजू शेट्टी बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी बँकेचे अध्यक्ष पै. विठ्ठलराव मोरे होते. कार्यक्रमाच्या सुरवातीस मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन आणि प्रतिमापूजन करण्यात आले.

अहवाल वाचनात पै. मोरे संस्थेच्या कार्याचा आढावा घेताना म्हणाले, सहकारी बँकांचे भवितव्य अंधकारमय होत चालले असताना अशा दोलनामय व अस्थिर वातावरणात सुध्दा बँकेने उत्तम नियोजन व कौशल्य पणाचा वापर केल्यामुळे अहवाल सालात १६ लाख ८२ हजार रूपये इतका नफा झाला आहे. यावेळी संस्थापक संचालक डॉ. जे. जे. मगदूम, उपाध्यक्ष अशोक रूणवाल, डॉ. श्रीवर्धन पाटील यांची भाषणे झाली.

याप्रसंगीजनसंपर्क व माहिती सहसंचालक प्रशांत सातपुते, दै. महानकार्यचे संपादक विजय पवार, दै. जनप्रवासचे पत्रकार अजित पवार व दै. पुण्यनगरीच्या पत्रकार आसमा सय्यद यांना उत्कृष्ठ पत्रकारितेचा पुरस्कार, जि. प. सदस्य प्रकाश परिट यांना शाहू पुरस्कार मिळाल्याबद्दल, तसेच इतर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला. आभार संचालक अजित पाटील यांनी मानले.




बापरे ! म्हणजे नेहमीसारखा दुष्काळ, नेहमीसारखे विरोधकांचे अकांडतांडव आणि नेहमीची सत्ताधाऱ्यांची आश्वासनं!!

# मारुती मानेंच्या नावे विशेष पुरस्कार द्या

**राजू शेट्टी : केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार**



मारुती माने

कवठेपिरान : हिंदकेसरी मारुती माने यांच्या नावाने केंद्र शासनाने विशेष पुरस्कार द्यावा, यासाठी संसदेत पाठपुरावा करणार असल्याचे खासदार राजू शेट्टी यांनी येथे सांगितले.

पै. मारुती माने यांचे नुकतेच निधन झाले. श्री. शेट्टी यांनी माने कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. या वेळी त्यांनी मारुती माने यांच्या कुस्त्यांना उजाळा देताना त्यांच्या नावे केंद्र शासनाने एक विशेष पुरस्कार द्यावा, यासाठी पाठपुरावा करणार आहे. येथे त्यांचे महाराष्ट्र शासनाने स्मारक करावे, यासाठीही प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. ते म्हणाले, ''कवठेपिरान गाव माझ्या मतदारसंघात आहे. त्यामुळे केंद्रीय क्रीडामंत्री प्रतीक पाटील यांच्याबरोबरही या संदर्भात बोलणार आहे.'' आमदार विनय कोरे यांनीही आपण महाराष्ट्र शासनाकडे स्मारकासाठी पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.

दरम्यान, मुख्यमंत्री अशोक चव्हाण इस्लामपुरातील कार्यक्रमासाठी येणार होते. त्यांची भेट घेऊन (कै.) माने यांचे स्मारक कवठेपिरानला व्हावे, यासाठी परिसरातील सर्वांनी एकत्र येऊन निवेदन तयार केले होते.

माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण व हिंदकेसरी मारुती माने यांचे अत्यंत घनिष्ठ संबंध होते. मुख्यमंत्र्यांचा दौराच रद्द झाल्याने निवेदन मंत्रालयात जाऊन देण्यात येणार आहे. दरम्यान, स्मारक वर्षभरात तयार करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.




जयसिंगपूर : येथील भिर्डी सभागृहात भरत अर्बन को- ऑप. बँकेची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभेवेळी बोलताना खासदार राजू शेट्टी. व्यासपीठावर इतर मान्यवर.

# मारुती मानेंच्या नावे विशेष पुरस्कार द्या

**राजू शेट्टी : केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार**


मारुती माने

कवठेपिरान : हिंदकेसरी मारुती माने यांच्या नावाने केंद्र शासनाने विशेष पुरस्कार द्यावा, यासाठी संसदेत पाठपुरावा करणार असल्याचे खासदार राजू शेट्टी यांनी येथे सांगितले.

पै. मारुती माने यांचे नुकतेच निधन झाले. श्री. शेट्टी यांनी माने कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. या वेळी त्यांनी मारुती माने यांच्या कुस्त्यांना उजाळा देताना त्यांच्या नावे केंद्र शासनाने एक विशेष पुरस्कार द्यावा, यासाठी पाठपुरावा करणार आहे. येथे त्यांचे महाराष्ट्र शासनाने स्मारक करावे, यासाठीही प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. ते म्हणाले, ''कवठेपिरान गाव माझ्या मतदारसंघात आहे. त्यामुळे केंद्रीय क्रीडामंत्री प्रतीक पाटील यांच्याबरोबरही या संदर्भात बोलणार आहे.'' आमदार विनय कोरे यांनीही आपण महाराष्ट्र शासनाकडे स्मारकासाठी पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.

दरम्यान, मुख्यमंत्री अशोक चव्हाण इस्लामपुरातील कार्यक्रमासाठी येणार होते. त्यांची भेट घेऊन (कै.) माने यांचे स्मारक कवठेपिरानला व्हावे, यासाठी परिसरातील सर्वांनी एकत्र येऊन निवेदन तयार केले होते.

माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण व हिंदकेसरी मारुती माने यांचे अत्यंत घनिष्ठ संबंध होते. मुख्यमंत्र्यांचा दौराच रद्द झाल्याने निवेदन मंत्रालयात जाऊन देण्यात येणार आहे. दरम्यान, स्मारक वर्षभरात तयार करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# भरत बँक गोरगरीब व कष्टकरी जनतेच्या पाठीशी उभी : खा. शेट्टी

**जयसिंगपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा)**: सहकार क्षेत्र अडचणीतून मार्गक्रमण करीत असताना भरत अर्बन बँक नेहमी गोरगरीब व कष्टकरी जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली आहे. बँक आपली आहे म्हणूनच प्रतिकूल परिस्थितीत सुध्दा आपण बँकेच्या पाठीशी राहून प्रगती साधली पाहिजे, असे प्रतिपादन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी केले.

येथील भिर्डी सभागृहात भरत अर्बन को-ऑप. बँकेची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत पार पडली. याप्रसंगी खासदार राजू शेट्टी बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी बँकेचे अध्यक्ष पै. विठ्ठलराव मोरे होते. कार्यक्रमाच्या सुरवातीस मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन आणि प्रतिमापूजन करण्यात आले.

अहवाल वाचनात पै. मोरे संस्थेच्या कार्याचा आढावा घेताना म्हणाले, सहकारी बँकांचे भवितव्य अंधकारमय होत चालले असताना अशा दोलनामय व अस्थिर वातावरणात सुध्दा बँकेने उत्तम नियोजन व कौशल्य पणाचा वापर केल्यामुळे अहवाल सालात १६ लाख ८२ हजार रूपये इतका नफा झाला आहे. यावेळी संस्थापक संचालक डॉ. जे. जे. मगदूम, उपाध्यक्ष अशोक रूणवाल, डॉ. श्रीवर्धन पाटील यांची भाषणे झाली.

याप्रसंगीजनसंपर्क व माहिती सहसंचालक प्रशांत सातपुते, दै. महानकार्यचे संपादक विजय पवार, दै. जनप्रवासचे पत्रकार अजित पवार व दै. पुण्यनगरीच्या पत्रकार आसमा सय्यद यांना उत्कृष्ठ पत्रकारितेचा पुरस्कार, जि. प. सदस्य प्रकाश परिट यांना शाहू पुरस्कार मिळाल्याबद्दल, तसेच इतर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला. आभार संचालक अजित पाटील यांनी मानले.



बापरे ! म्हणजे नेहमीसारखा दुष्काळ, नेहमीसारखे विरोधकांचे अकांडतांडव आणि नेहमीची सत्ताधाऱ्यांची आश्वासनं!!

# पपईवर मिली बग रोगाचे नवे संकट

## शेतकरी चिंतेत; राज्यात प्रथमच रोगाचा प्रादुर्भाव



**पुणे :** द्राक्ष, कापूस पिकांवरील मिली बगची समस्या शेतकऱ्यांसमोर 'आ' वासून उभी असतानाच, मोठा उद्रेक करण्याची क्षमता असलेला नवा घातक मिली बग राज्यात पपई पिकावर प्रथमच आढळला आहे. पुणे परिसरातील एका पपई बागेत मोठ्या प्रमाणात याचा प्रादुर्भाव झाला आहे. या मिली बगची ओळख अद्याप निश्चित झाली नसली, तरी तो पॅराकोकस मार्जिनेटस मिली बग असण्याचा तर्क असून, दक्षिण भारतातून रोपे किंवा फळांच्या माध्यमातून येथे आला असावा, असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. यास प्राथमिक पातळीवर तमिळनाडू कृषी विद्यापीठाने 'अॅग्रोवन'कडे दुजोरा दिला आहे.

कापूस, डाळिंब, टोमॅटो, वांगी, भेंडी, तुती, लिंबूवर्गीय फळझाडे आदी ५५हून अधिक पिकांत मोठ्या प्रमाणात उद्रेक करण्याची क्षमता असलेल्या या मिली बगबाबत शेतकऱ्यांनी वेळीच सावध व्हावे. याबाबत प्रादुर्भावाची जराही शंका आल्यास त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन शास्त्रज्ञांमार्फत करण्यात आले आहे.

महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत पुणे कृषी महाविद्यालयातील कीटकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. सु. शं. जाधव, शास्त्रज्ञ डॉ. दा. सं. पोखरकर, डॉ. र. वि. नाकट, तसेच विद्यापीठाच्या कीटकनाशक विभागाचे प्रमुख डॉ. अजित चंदेले यांनी याबाबत माहिती दिली. नवी दिल्ली येथील राष्ट्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्राचे (एनसीआयपीएम) संचालक डॉ. ओ. एम. बंबावाले यांनीही या पपई बागेला भेट देऊन प्रादुर्भावाची परिस्थिती जाणून घेतली. डॉ. बंबावाले यांच्यानुसार सदर मिली बग तुती पिकालाही प्राधान्य देतो.



रेशीम उत्पादकांनी आपल्या तुती बागेचेही काळजीपूर्वक निरीक्षण करावे, असा सल्लाही त्यांनी दिला आहे. राज्यातील पपई तसेच अन्य कोणत्या पिकांत या मिली बगचा प्रसार झाला आहे का, याबाबत राहुरी कृषी विद्यापीठामार्फत सर्वेक्षण मोहीम घेणार आहे.

पिकाचे नुकसान करण्याची पद्धत, लक्षणे, प्राथमिक ओळख व वर्णनानुसार हा मिली बग 'पॅराकोकस मार्जिनेटस' असल्याचा तर्क पुणे कृषी महाविद्यालयाच्या कीटकशास्त्र विभागातील शास्त्रज्ञांनी काढला आहे; मात्र या मिली बगबाबत निश्चिती करण्यासाठी बंगळूर येथील जैविक नियंत्रण प्रकल्प संचालनालयाकडे त्याचे नमुने पाठवण्यात आले आहेत. या संचालनालयाचे शास्त्रज्ञ येथे भेट देणार आहेत.

पुणे परिसरात पपईच्या बागेत आढळलेल्या या मिली बगने झाडाचा बुंधा, खोड, फांद्या, पाने, फळे अशा सर्वच भागांवर मोठा प्रादुर्भाव निर्माण केल्याने बाग जवळपास संपुष्टात आणण्याचीच परिस्थिती निर्माण केली आहे. त्याचबरोबर परिसरातील केणा व अन्य तणांवरही त्याने आक्रमण केले आहे. पुण्यात पाऊस सुरू होण्यापूर्वीचे कोरडे व उष्ण हवामान या मिली बगच्या वाढीस अनुकूल ठरल्याचे या शास्त्रज्ञांनी सांगितले.

मूळ मेक्सिकोतील असलेला हा मिली बग तमिळनाडू राज्यातील कोइमतूर परिसरातील पपईच्या बागेत यापूर्वी आढळला. त्यानंतर परिसरातील तीन जिल्ह्यांत त्याचा प्रादुर्भाव झाला. श्रीलंका, थायलंड, बांगला देश आदी देशांतही त्याचे अस्तित्व आहे. यंदाच्या वर्षी मार्चमध्ये बंगळूर परिसरात या किडीचा प्रवेश झाला आहे. हा मिली बग अत्यंत घातक असून कापूस, तुती, भाजीपाला, फळपिके, वालवर्गीय पिके, तणे यांच्यावरही याचा प्रादुर्भाव होऊ शकतो. वारा, पाणी व प्रादुर्भावग्रस्त बागेतील मानवी हालचालींच्या माध्यमातून या किडीचा प्रसार होतो. जमिनीतील बुंध्यापासून ते झाडाच्या शेंड्यापर्यंत पिकाचा कोणताही भाग या मिली बगच्या हल्ल्यातून वाचू शकत नाही. प्रादुर्भाव झाल्यापासून महिन्याभरात बागेचे संपूर्ण नुकसान होऊ शकते, त्यामुळे आपल्या बागेचे सतत सर्वेक्षण करावे. अशा स्वरूपाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास त्वरित कृषी महाविद्यालयाच्या कीटकशास्त्र विभागाशी संपर्क साधावा. किडीचा प्रसार जागीच थांबवण्यासाठी झाड बागेतच उपटून ते जाळून टाकावे असा सल्लाही देण्यात आला आहे. हा मिली बग धोकादायक असला तरी त्यात शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये. वेळीच प्रतिबंधक उपायांनी त्याला रोखणे शक्य असल्याचेही या शास्त्रज्ञांनी सांगितले.

# शेती व्यवसायाला नवी दिशा देणारे हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटर

पारंपारिक पद्धतीने शेती व्यवसाय करण्याची जडलेली सवय आणि शेतीच्या प्रगत ज्ञानविज्ञान तंत्रज्ञानाबाबतची अकारण भीती, यामुळे देशातील शेतकरी वर्ग त्यांच्या शेतीला शेतीउद्योग व्यवसायाचे ठोस उत्पन्नाचे निश्चित स्वरुप देऊ शकत नाहीत. नवीन विज्ञान-तंत्रविज्ञानाबाबत भीती वाटणे जरी साहजिक असले तरी त्यात अशी कोणतीही अवघड आणि जमणारच नाही, अशी कोणतीच बाब नाही. हाच धागा धरून हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटरने शेतकऱ्यांच्या मनातील शंका, भीती आणि गैरसमज दूर करण्याचे प्रयत्न गेली दोन वर्षे केले आहेत. त्यात मिळालेले यश पहाता, शेतकऱ्यांमधील आत्मविश्वास दृढ करणे आणि उद्योगाच्या धर्तीवर शेती करण्यास त्यांना योग्य तेच मार्गदर्शन, मदत आणि प्रोत्साहन देण्याचे कार्य हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटरमध्ये प्रगतिपथावर आहे. करता करता शिका, अशा वैशिष्ट्यपूर्ण प्रशिक्षण पद्धतीमुळे या केंद्राचा नावलौकिक केवळ गेल्या दोन वर्षात देशातील २२ राज्ये तसेच पाकिस्तान, भूतान, श्रीलंका, नेपाळ अशा शेजारी राष्ट्रांच्या सीमा ओलांडून थेट फ्रान्सपर्यंत जाऊन पोहचला आहे. परदेशातूनही शेतकरी या केंद्रात प्रशिक्षणासाठी येत आहेत.



तीन वर्षापूर्वी, ऑक्टोबर २००३ मध्ये हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटरमधील प्रशिक्षण कार्यक्रमाला सुरुवात झाली. आशिया खंडातील एकमेव असलेल्या या केंद्रातील प्रशिक्षणाला सुरुवातीपासूनच मोठा प्रतिसाद मिळू लागला. २२ राज्यातील २५०० हून अधिक जणांनी येथील प्रात्यक्षिकांवर आधारित निवासी प्रशिक्षणाचा लाभ घेतला. त्यात २४५ महिला प्रशिक्षणार्थी होत्या.ही विशेष नोंद घेणारी बाब ठरली आहे. निरक्षर शेतकऱ्यांनीही प्रशिक्षणात सहभागी होऊन जो उत्साह दाखविला आणि पारंपारिक शेती पद्धतीला नवीन तंत्रज्ञानाची जोड देण्याचे पाऊल उचलले. ते पाहता या केंद्राचे कार्य योग्य दिशेने सुरू असल्याची पावती मिळते.

संपूर्ण देशातील मिळणाऱ्या प्रतिसादाचे श्रेय येथील वैशिष्ट्यपूर्ण प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिकांवर आधारित मार्गदर्शन पद्धतीला जाते. फुलशेती किंवा हरितग्रहातील शेतीसाठीची सर्व प्रकारची यंत्रसाधने, सामुग्री प्रत्यक्ष हाताळण्यास/वापरण्यास मिळाल्याने प्रशिक्षणार्थींना त्याबाबतची खात्री पटली आहे. हरितगृहाच्या उभारणीपूर्व तंत्रज्ञानापासून ते प्रत्यक्ष उभारणी, देखभाल, पीक उत्पादनाचे विज्ञान आणि शेवटी व्यापार व्यवसायाचे व्यवस्थापन अशा महत्वाच्या प्रत्येक टप्प्यांची माहिती अभ्यासक्रमात समाविष्ठ केली आहे. एकाच छत्राखाली हरितगृह प्रकल्पांची माहिती आणि मार्गदर्शन मिळत असल्याने शेतकऱ्यांचा आणि शेती उद्योगात येऊ इच्छिणाऱ्यांचा मोठा प्रतिसाद केंद्राला मिळतो आहे. शेजारी राष्ट्रांपैकी पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ देशातील कृषी विभागाकडूनही अशा प्रशिक्षणासाठी मागणी आली आहे.

पीकनिहाय अभ्यासक्रम आणि विशिष्ट पिकासाठी पूर्ण स्वतंत्र अभ्यासक्रम देण्याची सुविधा सुरु केल्याने यास गटनिहाय प्रशिक्षणार्थींचा मोठा प्रतिसाद मिळतो आहे. गुलाब, जर्बेरा, कार्नेशन ऑर्किड आणि ॲंथ्युरिअम या फुलांच्या पिकांचा त्यात समावेश आहे. रोपनिर्मिती, अनिवृध्दी, रोपवाटिका व्यवस्थापन, फळे व भाजीपाला पिकांची लागवड, शोभिवंत झाडांच्या रोपांची निर्मिती, व्यवसाय तसेच अशा व्यापक विषयांना अभ्यासक्रमांच्या व प्रशिक्षणाच्या नियोजनात स्थान देण्यात आले आहे. प्रकल्प उभारणीसाठीही येथील तज्ज्ञ हे प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष मदत करीत असतात. त्यामुळे अनेक लहान मोठे प्रकल्प प्रशिक्षणार्थींनी उभे केले आहेत. केंद्राचे संचालक डॉ. सुरेश धुमाळ यांनी शेतकऱ्यांच्या गरजेनुसार व क्षमतेनुसार अभ्यासक्रमांचे केलेले नियोजन दोन वर्षात यशस्वी ठरले आहे. संस्थेचे अध्यक्ष तसेच राज्याचे पणनमंत्री श्री हर्षवर्धन पाटील यांनी या केंद्राचा उपयोग जास्तीतजास्त लोकांना व्हावा आणि शेतीच्या गरजा भागविल्या जाव्यात म्हणून सतत सक्रिय राहून मार्गदर्शन केलेले आहे. वैयक्तिक लक्ष घातल्यामुळेच या केंद्राचा उपयोग व्यापक आणि गतीमान झाला आहे. उद्यान विद्येतील जे जे काही नवं आणि शेतकऱ्यांना उपयुक्त असेल ते ते सर्व हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटरमध्ये सुसज्ज असावे, म्हणून हर्षवर्धन पाटील यांनी घेतलेल्या आग्रही भूमिकेमुळे या केंद्रात हवामान अंदाजाचा वेध घेणारी उच्च क्षमतेची वेधशाळा उभारण्याचे काम सुरु आहे. शालेय आणि महाविद्यालयीन (कृषी, वैद्यकीय, आयुर्वेदिक, होमिओपॅथी इ.) विद्यार्थ्यांना विविध वनस्पतींची पद्धतशीर माहिती व्हावी आणि लहान वयात त्यांच्यात शेतीची आवड निर्माण व्हावी म्हणून ट्रेनिंग सेंटरतर्फे विद्यार्थ्यांना विनामूल्य माहिती दिली जाते.

फूलशेती प्रशिक्षण कार्यक्रमात महिलांच्या हिरीरीने सहभागी होण्याच्या घटनेची नोंद घेत महिलांसाठी फीमध्ये ५५ टक्के विशेष सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे महिला बचत गट, महिला मंडळे, महिलांच्या संस्था किंवा तत्सम गटांना आता प्रशिक्षण घेणे अधिक सोपे व फायद्याचे ठरणार आहे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी श्री. पाटील यांच्या भूमिकेचे ग्रामीण भागातून जोरदार स्वागत होत आहे. नजिकच्या काळात हार्टिकल्चर ट्रेनिंग सेंटरमध्ये दीर्घ मुदतीचे शासकीय मान्यतेचे प्रगत प्रशिक्षण कार्यक्रमप्रगत प्रशिक्षण कार्यक्रम तसेच गटनिहाय किंवा कार्पोरेट सेक्टरसाठी त्यांच्या गरजेप्रमाणे हवा तो विशिष्ट विषयांचा स्वतंत्र अभ्यासक्रम विकसित करून त्यांचे प्रशिक्षण देण्याचा श्री. हर्षवर्धन पाटील यांचा मानस आहे.

मिळालेला मोठा प्रतिसाद पाहता, सेंटरने आता आपल्या कार्याची व्याप्ती वाढविली आहे. टिश्युकल्चर अभ्यासक्रमांचा आता नव्याने समावेश केला आहे. उती संवर्धन (टिश्युकल्चर) तंत्रज्ञानाचे वाढते महत्व पाहता हा अभ्यासक्रम अनेक दृष्टीने उपयुक्त ठरणार आहे. रोपांच्या निर्मितीसाठी वापरात येणाऱ्या पारंपारिक पद्धतीत गुणवत्तेच्या दृष्टीने अधिक त्रुटी आहेत. त्या दूर करून उच्च दर्जाची, अधिक उत्पादने देणारी आणि रोगांच्या प्रादुर्भावाला बळी न पडणारी सक्षम रोपे तयार करण्याचे सामर्थ्य टिश्युकल्चर तंत्रात आहे. बिया किंवा शास्त्रीय फांद्या, खोड, मुळे इत्यादी पासून तयार केल्या जाणाऱ्या रोपांपेक्षा टिश्यु कल्चर पद्धतीने तयार केलेली रोपे खात्रीने भरीव व दर्जेदार पीक देतात. त्यासाठी लागणारा कालावधी खूप कमी असतो आणि लहान जागेत रोपांची निर्मिती करता येते. रोप निर्मितीसाठी वापरात येणाऱ्या तंत्रज्ञानाचा खर्च जास्त असला, तरी त्यापासून मिळणारे फायदे पाहता शेतकऱ्यांची वाया जाणारी मेहनत, खर्च यांची मोठी बचत होते. भरघोस उत्पन्न आणि उच्च दर्जा प्राप्त करता येत असल्याने टिश्युकल्चर शेतकऱ्यांसाठी वरदान ठरले आहे. टिश्यु कल्चरद्वारे व्यावसायिक धर्तीवर रोपनिर्मिती करण्याचा स्वतंत्र जोड होती व्यवसाय पूरक उत्पन्नासाठी उपयुक्त सिद्ध झाला आहे. हे सर्व लक्षात घेऊन हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटरने प्रशिक्षणाबरोबर या सुविधेचा उपयोग व्यवसायिक रोप निर्मितीसाठीही करण्याचे योजले आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांना या केंद्रातून खात्रीची रोपे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. शोभिवंत फुलांची रोपे, भाजीपाला आणि फळांच्या रोपांची निर्मिती त्याद्वारे करता येते. शंभराहूनही अधिक जातीच्या अशा वनस्पतींची रोपे या तंत्रज्ञानाद्वारे तयार करता येतात. हरितगृहातील पिकांच्या लागवडीसाठी अशी रोपे म्हणजे खात्रीची, दर्जेदार भरपूर उत्पन्न देणारी ठरतात. केंद्रातील या सुविधेचा व्यापक विस्तार पूर्णत्वाच्या मार्गावर आहे.

# गोकुळ कडून माहिती देण्यास टाळाटाळ

**कोल्हापूर (स्वाभिमानी वृत्तसेवा):** कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ, कोल्हापूर यांच्याकडून दूध संघातील माहितीच्या अधिकाराखाली माहिती देण्यास टाळाटाळ केली जात आहे. त्वरीत माहिती न दिली गेल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा पाटपन्हाळा येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे शाखाध्यक्ष विठ्ठल आनंदा पाटील यांनी निवेदनाव्दारे दिलेला आहे.

२३ डिसेंबर २००८ रोजी माहितीच्या अधिकाराखाली त्यांनी गोकुळमध्ये दररोज किती लिटर दूध संकलन होते, दररोज दूध उपपदार्थांसह किती विक्री होते, त्यासाठी दररोज कामगार ८ तासाच्या पाळीत आवश्यक किती आहेत. वर्षाचे किती दूध आवक होते. व व्रिकी होते. आपल्याकडे कायम किती आणि रोजदांरीवर किती कामगार आहेत, आणि त्यांच्या शासकीय एनडीडीबी च्या धोरणानुसार किती जादा अगर कमी पगार होतो. जिल्ह्यात इतर दूध संघ असल्याने वर्षात आपले दूध घटले किती आणि वाढले किती तसेच याचा संघावर कोणता परिणाम झाला. महालक्ष्मी पशुखाद्याबाबतीत सविस्तर माहिती देण्यात यावे. अशी माहिती विठ्ठल पाटील यांनी मागविली होती. मात्र त्यांच्या पत्राला गोकुळ ने वाटाण्याच्या अक्षता दाखवल्या आहेत. सहाय्यक उपनिबंधक सहकारी संस्था, (दुग्ध) यांच्याकडे तक्रार केली होती. मात्र त्यांनीही फारशे समाधानकारक उत्तर दिलेले नाही. केवळ उडवाउडवीची उत्तरे देऊन तोंडाला पाने पुसण्याचा प्रयत्न केला. त्यांनतर त्यांनी प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी पुणे यांच्या कार्यालयात तक्रार केली. त्यानी देखील उडवाउडवीची उत्तरे दिली. सहकार मंत्र्यांनीही अशीच उत्तरे देऊन गोकुळ चीच पाठराखण करण्याचा प्रयत्न केला. संघाने भ्रष्टाचार लपविण्यासाठी माहिती देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप त्यांनी नियेदनाव्दारे केला आहे.




सांगली : दुधात भेसळीसाठी वापरल्या जाणाऱ्या रिसी माल्डेक्स पावडरचा साठा सोमवारी जप्त करण्यात आला. अतिरिक्त पोलिसप्रमुख बाळासाहेब वाघमोडे यांनी त्याची पाहणी केली.

# भेसळीचे दूध बनवणाऱ्या तिघांना अटक

## सांगली जिल्ह्यात कारवाई; स्टार्च पावडर, युरियाचा वापर उघड

**सांगली (स्वाभिमानी वृत्तसेवा):** सांगली जिल्ह्यात सुरू असलेल्या दूध भेसळीच्या रॅकेटचा स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाने पर्दाफाश केला. युरियासह बेकिंग पावडरसह कृत्रिम दूध निर्माण करून भेसळीचा कारभार करणाऱ्या कवठेम हांकाळ तालुक्यातील आगळगाय व बोरगाव येथे छापे टाकून दोघांना रंगेहाथ पकडले. तसेच त्यांच्यासह अशा अनेक केंद्रांना बेकायदा पावडरसह केमिकल पुरविणाऱ्या सांगलीतील बिपीन सुपर मार्केटमधील अड्ड्याचाही कारभार चव्हाट्यावर आणला.

ते पाच लिटर पाण्यात अर्धा किलो रिसी मोल्डेक्स नावाची स्टार्च पावडर आणि मूठभर युरिया मिसळून त्याचे दुधात रूपांतर करत होते. आरोग्याला घातक असे भेसळयुक्त दूध बाजारात आणून हे लोक हजारो लोकांच्या जीवाशी खेळत होते, अशी माहिती अतिरिक्त पोलिस प्रमुख बाळासाहेब वाघमोडे यांनी दिली. राजेंद्र रामचंद्र पाटील (वय ३५, बोरगाव), हिंमत पांडुरंग पाटील (२२, आगळगाव) आणि हरिष हरभक्षराय दुलानी (कर्नाळ रोड, सांगली) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

# संपन्न महाराष्ट्र दरिद्री का झाला?

▶ पान १ वरून

घडून आली असे कधीकधी सांगण्यात येते. वादासाठी हे जरी खरे मानले तरी त्यातून दोन गोष्टी स्पष्ट होतात. एक म्हणजे सध्याच्या काळामध्ये असे स्थलांतर अटळ आहे. पोट भरण्यासाठी अविकसित भागाकडून विकसित भागांकडे स्थलांतरित होणे स्वाभाविक आहे. कारण ही आर्थिक प्रक्रिया आहे. ही थांबविणे अतिशय कठिण आहे. त्यामुळे ती सबब सांगू नये. पण त्याचबरोबर हेही तितकेच खरे की वाढत्या शहरी लोकसंख्येला रोजगार पुरवून त्यांचे दारिद्रय विवारण करणे महाराष्ट्र राज्याला शक्य झालेले नाही. बाहेरून येणारे लोक प्रामुख्याने मुंबईमध्ये येतात. तेथे दारिद्रय वाढते. यामुळे मुंबई शहराचे दारिद्रय, त्याची कारणे व उपाय याचे वेगळे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे.

शहरी दारिद्रय बाहेरून येणाऱ्यांमुळे वाढते, असे म्हणतात. ठीक आहे. पण मग ग्रामीण दारिद्रयाचे काय? १९९७ - २००२ मध्ये महाराष्ट्रातील ग्रामीण दारिद्रय ३४.६ टक्क्यांवरून ३५.२ टक्के इतके वाढले. ही वाढ स्थलांतरीतामुळे नक्कीच नाही. मग याचे कारण काय? आपण विचार करू! राज्यामध्ये सुमारे ६० टक्के लोकसंख्या पोट भरण्यासाठी शेतीवर अवलंबून आहे. निदान ५० टक्के जमीन अन्नधान्य पिकाखाली आहे. त्यापैकी साधारण ५५ टक्के जमीन फक्त ज्वारी आणि बाजरी या दोन पिकाखालीच आहे. ही पिके सर्वात कमी उत्पन्न देणारी पिके आहेत. शेताचे आणि तसेच शेतकऱ्याचे उत्पन्न यामुळे कमी राहते. इकडे राज्याच्या एकूण उत्पन्नामध्ये शेतीचे योगदान १२ टक्के आहे. अशा शेतीक्षेत्राकडे गेली कित्येक वर्षे सातत्याने सरकारचे अक्षम्य दुर्लक्ष होत राहिले आहे. परिणामी शेतीचे दर हेक्टरी उत्पादन आणि अन्नधान्याचे दन हेक्टरी उत्प- ादन गेली कित्येक वर्षे सातत्याने घसरत चालले आहे. याबाबतीत राज्याच्या क्रमांक देशामध्ये जवळजवळ शेवटचा आहे. शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या विशेष कमी होत नाही. शेतीचे उत्पन्न मात्र वाढत नाही. मग शेतकरी दरिद्री झाला यात आश्चर्य काय? तर शेतीची होत असलेली दुरवस्था हे वाढत्या ग्रामीण दारिद्रयाचे प्रमुख कारण होय याकडे प्रशासन कधी लक्ष देणार? दारिद्रय निवारणासाठी शेतीमध्ये आर्थिक गुंतवणूक सरकारतर्फे झाली पाहिजे असे अनेक अर्थशास्त्रज्ञांनी अनेक वेळा सांगूनसुध्दा प्रत्यक्षामध्ये फारसे कापी होत नाही. परंतु त्याशिवाय तरणोपाय नाही हेही तितकेच खरे! काय होते ते पहायचे? १९९३ - ९४ मध्ये महाराष्ट्र, तामीळनाडू आणि पश्चिमबंगाल या राज्याम ध्ये एकूण दारिद्रयाचे प्रमाण अनुक्रमे ३६.८६ टक्के, ३५.३ टक्के आणि ३५.६६ टक्के से होते. फारसा फरक नव्हता. २००४ - २००५ मध्ये मात्र ते प्रमाण अनुक्रमे ३०.७ टक्के, २२.५ टक्के आणि २४.७ टक्के असे झाले. तामिळनाडू आणि पश्चिमबंगाल ही राज्ये महाराष्ट्राइतकी उद्योगप्रधान आणि विकसित नसूनसुध्दा तेथील दारिद्रय प्रमाण १९९३ - ९४ ते २००४ - २००५ या काळात अनुक्रमे जवळजवळ ३६ टक्के आणि ३० टक्के इतके लक्षणीय प्रमाणत कमी झाले. त्याच काळात महाराष्ट्रातील दारिद्रयाचे प्रमाण केवळ १७ टक्के कमी झाले. दारिद्रयनिवारणाच्या सत्कार्यामध्ये महाराष्ट्र मागे पडला. महाराष्ट्राच्या ग्रामीण रोजगार हमी आणि इतर विकास योजना यांचा गवागवाच फार झाला. प्रत्यक्ष परिणाम फारसा झालेला नाही. उत्तर प्रदेश आणि बिहार या आणि इतर विकास योजना यांचा गवागवाच फार झाला. उत्तर प्रदेश आणि बिहार या राज्यांची बिमारू अशी हेटाळणी केली जाते. त्यांच्याच पंक्तीला महाराष्ट्रासारखे पुरोगामी राज्य जाऊन बसले. याला काय म्हणाले? गेल्या काही वर्षामध्ये बिहार राज्याच्या आर्थिक विकासाने वेग पकडला आहे. छत्तीसगढ राज्यामध्ये गरिबांना स्वस्त अन्नझधान्य पुरवठा तर मध्यप्रदेशामध्ये केंद्र सराकारची म. गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना उत्तम प्रकारे काम करीत आहेत. असे मान्यवर तज्ज्ञांचे निष्कर्ष आहेत. यामुळे ती राज्ये दारिद्रय



# कांदा लागवड फायदेशीर

कांदा हे भारतातील अत्यंत महत्त्वाचे पीक असून त्याची वर्षभर मागणी बाजारातून असते. देशातील कांद्यांचे उत्पादन कमी, त्याचबरोबर साठवणुकीत होणारे नुकसानही जास्त असल्याने त्याच्या उपलब्धतेवर आणि बाजारभावावर सतत परिणाम होत असतो. राज्यात बहुदा सर्व जिल्ह्यात कांद्यांची लागवड केली जाते. कांद्यांचे लागवड सर्व हंगामात केली जाते. परंतु कांद्यांचे साठ ६० टक्के उत्पादन हे रब्बी हंगामात घेण्यात येते. त्याची काढणी प्रामुख्याने एप्रिल मे महिन्यामध्ये होते. हा कांदा ३ ते४ महिने साठवणूक केल्यास ऑक्टोबर - नोव्हेंबर पर्यंत ते खरीप पिकाचे उत्पादन निघेपर्यंत सुस्थितीत राहू शकतो. देशातील संपूर्ण बाजारपेठ जून ऑक्टोबर पर्यंत साठवणुकीतील कांद्यावर अवलंबून असते. या कालावधीत देशात कोठेही मोठ्या प्रमाणात कांद्यांची काढणी चालू असते. म्हणून शेतकऱ्यांनी कांद्यांची लागवड अशा तऱ्हेनी करावयाचे की कांदा शक्यतो जुलै ते ऑक्टोबर या दरम्यान मार्केटला यावा यामुळे शेतकऱ्यांना अधिक चांगले दर मिळू शकतात. सद्या कांद्याला भाव फारच आहे. म्हणून कांद्यांची लागवड करून फायदा करून घ्यावा. कांद्यांची लागवड उत्तम तऱ्हेने करण्याती पध्दत खाली दिले आहे. त्याचा उपयोग करून घेऊन शेतकऱ्यांनी कांदा लागवड करून घ्यावे.

जमिन व हवामान : लागवडीसाठी हलक्या मुरमाच्या व उताराच्या जमिनी निवडाव्यात. व ह्यात उताराशी समातंर रूंद गादीवाफे करावेत. गादीवाफ्याची लांबी १२० सें.मी. असावी व दोन बाजूच्या सऱ्या एक फूट रूंदीच्या असाव्यात. गादीवाफ्यावर रोपांची लागवड केल्यास जादापाण्यामुळे अथावा पावसाचे पाणी साठल्यामुळे कांदा सडणे किंवा मान लांबणे हे प्रकार होत नाहीत. सरी वरब्यांत कांदा घेता येतो. पण सरीत पाणी बराच काळ साचून राहिले व पाणी व्यवस्थित वाफ्याच्या बाहेर काढता आले नाही तर सड वाढते. याशिवाय सरी वरंब्यात रोपांच्या संख्या लागवडीत बसते. रोपांची लागवड १० बाय १५. १५ बाय १५ सेंमी. अंतरावर पून काढणी करावी. रोप लागवड करताना ती अंगठ्याने दाबू नये यामुळे माना वाकड्या होऊन वाढीस वेळ लागतो.

२) कांद्यांची जातः शक्यतो पारंपारिकरित्या वाढवलेल्या हळव्या बी न वापरता कांदा संशोधन केंद्र, कृषि विद्यापीठ यांच्या कडून बीयाणे ७८०, फुले समर्थ ॲग्रीफाउंड डार्क, रोड, अर्क कल्याण, भीमा सुपर जातीचा वापर करावा.

## पिक-पाणी

डॉ. जिनेंद्र धनपाल चौगुले
प्लॉट नं. २९, चंद्रधन, माहेर हॉस्पिटलजवळ नांदणी रोड, जयसिंगपूर. येथे संपर्क साधावा. फोन २२४५१९. मो. ९९२२७७२८१५

३) खतांच्या मात्रा : कांद्यासाठी प्रती हेक्टरी १०० ते १२५ किलो नत्र ७५ किलो स्फुरद व ७५ कि. पालाश व ५० कि. सल्फर (गंधक) या खते वापरावीत. तसेच १० टन शेणखत व ५ टन कंबडी खत पाळीपूर्वी द्यावे. तसेच ५ ते १० कि. प्रति हेक्टरी ट्रायकोडर्मा व्हीरडी कंपोस्ट खतात मिसळून शेतात सम प्रमाणात द्यावा. नंतर रूंद गादीवाफे तयार करण्यापूर्वी हेक्टरी ५० कि. नत्र, ७५ कि. स्फुरद व पालाश प्रत्येकी व बेनस्लफ (गंधक) ५० कि. हे सर्व खते पेरावे. खत पेरून गादी वाफे तयार करावेत. राहिलेले नत्र खताची मात्रा तीन चार आठवड्यात द्यावे. पानांची वाढ रोखण्यासाठी व कांदे पोसण्यासाठी ६० ते ७५ दिवसांचे असताना त्यावर लिहोसील हे वाढ प्रतिबंधक संजिवक फवारावे. १० लिटर टाकीत ६० मिली. लिहोसील मिसळून फवारणी करावी.

४) पाणी व्यवस्थापन : जमिनीची प्रत पाहून ८ ते १० दिवस अंतराने कांद्याला पाणी मोजके द्यावे. कांदा ठिबक किंवा तुषार सिंचनाखाली लागवड करता येतो. शक्यतो कांदा काढणीपूर्वी दोन आठवडे अगोदर पाणी बंद करावे. त्यामुळे कांदा पोसतो, सड कमी होतो, मान जड होत नाहीत.

५) तणांचा बंदोबस्त : कांद्यामध्ये तणांचा बंदोबस्त वेळेवर केले नाहीतर ४० ते ५० टक्के नुकसान होते. म्हणून वेळेवर तणांचा बंदोबस्त करता येते. त्यासाठी रोपांची लागवड करण्यापूर्वी अगोदर वाफ्यावर गोल तणनाशक १५ मिली. १० लिटर पाण्याचा टाकीत मिसळून फवारली तर ४५ दिवसापर्यंत तणांचा उपद्रव होत नाही.

६) रोग व किडीचा बंदोबस्त : जमिनीत पाण्याचा निचरा न झाल्यास करपा, काळवट, डाग, माना लांब होतात, पाने पिवळी पडताात. बुडका सडणे, मुळे गुलाबी होऊन खओड कुजणे, असे अनेक रोग दिसून येतात. या रोगाचे नियंत्रण करण्यासाठी पिकांची फेरपालट करावी. पाण्याचा चांगला निचरा होणाऱ्या हलक्या जमिन लागवडीस वापरावे. शेणखत चांगले कुजलेले असावे. ५ ते १० कि. ट्रायकोडर्मा व्हीरडी वापरावे. रोपांचे मूळ बाविस्टन १ ग्रॅम प्रतिलिटर पाण्यात लागणीपूर्वी बुडवावेत. डायथेन एम. ४५ किंवा बाविस्टन या बुरशीनाषका सोबत कार्बोसल्फान किंवा एंण्डोसल्फान या किटक नाशकाचा वापर करावा. प्रत्येक फवारणीच्या द्रावणात स्टिकर जरूर वापरावा. फवारणी दर १२ ते १५ दिवसाच्या अंतराने आवश्यकतेनुसार करावी. कांदा रूंद गादी वाफ्यावर केल्यास २५ ते ४० टनापेक्षा जास्त उत्पादन मिळते. तरी कांद्याच्या लागवडीचे वरील तंत्रज्ञान वापरून शेतकऱ्यांनी फायदा करून घ्यावा.